विद्यापीठ अध्यापकांमधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता Electoral Roll तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत.



## निवडणूक शाखा

## विद्यापीठ अध्यापकांची अधिसभेवरील निवडणूक

## अधिसूचना

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र शासनाने दि. ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागू केलेला आहे. त्यातील कलम २८ (२) नुसार अधिसभेचे गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम (ध) नुसार विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून ०३ विद्यापीठ अध्यापक निवडून द्यावयाचे आहेत. त्यादृष्टीने उमविच्या सर्व शैक्षणिक प्रशाळा/विभागातील पूर्णकालीक अध्यापकांची यादी तयार करुन त्यातून विद्यापीठ अध्यापक गटाचा मिळून बनलेला निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करावयाचा आहे.

त्या अनुषंगाने आपल्या प्रशाळा / विभागातील संबंधीत अध्यापकांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट दिल्यावर www.nmu.ac.in/election या link मध्ये विहित केलेला अर्ज online पध्दतीने भरण्याबाबत तसेच संपूर्ण माहिती भरल्यानंतर त्यांची प्रिन्ट काढून त्यावर स्वाक्षरी करुन आवश्यक दस्तऐवजासह दि.२९/६/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेच्या आत आपल्या प्रशाळेत / विभागात जमा करण्यात यावेत.

विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी पत्रासोबत जोडल्या आहेत. प्रत्येक अध्यापकांच्या माहितीसोबत खालील दस्तऐवज स्वाक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. (संबंधिताने स्वत: स्वाक्षांकीत केलेले कागदपत्र ग्राह्य धरण्यात येतील.)

१) व्याख्याता/सहायक प्राध्यापक/प्रपाठक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक म्हणून विद्यापीठाच्या नियुक्ती पत्राची प्रत.

२) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.

३) अध्यापक मागास प्रवर्गातील असल्यास त्यांच्या जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत.

मा.संचालक / विभागप्रमुखांकडे प्राप्त होणारी माहिती एकत्रित व प्रमाणित करुन दि.३०/०६/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेच्या आत विद्यापीठाच्या निवडणूक शाखेत जमा करावयाची आहे. ज्या प्रशाळा / विभागातील अध्यापकांची माहिती विहित मुदतीत प्राप्त होणार नाही, त्या प्रशाळा / विभागातील अध्यापकांच्या नावाचा मिळून बनलेल्या निर्वाचक गणामध्ये (Electoral Roll) समावेश होणार नाही, त्यास सर्वस्वी संबंधित प्रशाळा / विभाग जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कायदा/परिनियम/अधिसूचनेमधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंदर्भात विवाद निर्माण झाल्यास कायदा/परिनियम/अधिसूचनेची इंग्रजी प्रतीमधील तरतूद प्रमाण मानण्यात येईल.

16/6/17

(प्रा. अ. बा. चौधरी)
प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/१८/२०१७
दिनांक: १६/०६/२०१७

**सोबत :-** अध्यापकांमधून विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी / पात्रता शर्ती संदर्भातील प्रत.

प्रति,

मा.संचालक/विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक प्रशाळा / विभाग,
उमवि,जळगाव

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12, 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

- **विद्यापीठ अध्यापकांमधून विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी**

**कलम २ (१९)** : **"विद्यापीठ अध्यापकांचा गट "** याचा अर्थ, जे विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचलित महाविद्यालयांचे पूर्णकालिक अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचलित महाविद्यालयांचे पूर्णकालिक अध्यापक यांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

**कलम २ (६८)** : "विद्यापीठ अध्यापक" याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेला पूर्णकालिक अध्यापक, असा आहे.

**कलम २८ (२)(ध)** : **अधिसभा**

विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे तीन अध्यापक, ज्यापैकी एक आळीपाळीने अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागास वर्ग यातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल ;

**महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील "विद्यापीठाच्या प्रशाळांमधील अध्यापकांमधून अधिसभा सदस्य म्हणून निवडून येणाच्या पात्रता शर्ती" :**

**कलम २८ (२)(ध)** : **अधिसभा :**

विद्यापीठ अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले -

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा.

(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

१६/६/१७

प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी